# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/10/2023 (बुधवार) दुपार

---

## रामटेक हद्दीत मिळून आलेल्या युवतीच्या मृत्यूचे गुढ उकलले

(स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणची कारवाई)

रामटेक हद्दीत एका अनोळखी महिलेचे मृतदेह बोरी जंगल शिवारात कुजलेल्या अवस्थेत मिळून आल्याची माहिती रामटेक पोलीसांना मिळताच त्यांनी घटनास्थळ गाठून सदर अनोळखी महिलेची ओळख पटविणेसंबंधी चौकशी केली असता कोणतीही माहिती मिळुन न आल्याने व तिच्या मरणाबाबत निश्चीत कारण समजून येत नसल्याने सदर ठिकाणचे पोलीस पाटील यांचे रिपोर्टवरुन अकस्मात मृत्युची नोंद घेण्यात आली. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) यांनी स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण विशेष पथक तयार करुन अनोळखी महिलेची ओळख पटविणे संबंधाने सुरूवात केली. तपासा दरम्यान महिलेचा गळा आवळुन खुन झाल्याचे प्रथमदर्शनी पुराव्यावरून दिसुन आल्याने अज्ञात आरोपीविरुध्द पो.स्टे. रामटेक गुन्हे रजि.नं. ७८५/२३ कलम ३०२, २०१ भादवि सहकलम ३(२), (५) अनु जाती आणि अनु जमाती (अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९) अन्वये खूनाचा गुन्हा नोंद करण्यात आला. तत्पुर्वी पोलीस स्टेशन रामटेक येथे दाखल मिसिंग क्रमांक ५४/२०२३ मधील अनोळखी महिलेचे शरीरावरील सलवार कुर्ता, हातातील बांगडी व पायातील पायपट्ट्या, उंची या वर्णनावरून पोस्टे कन्हान येथे दाखल मिसिंग क्रमांक ४९/२३ मधील हरविलेली महिला दिव्या छोटूलाल यादव व २१ वर्ष राहणार बोरी (सिंगोरी) हिचे सदरचे प्रेत हे दिव्या छोटूलाल यादव व २१ वर्ष राहणार बोरी (सिंगोरी) हिचे असल्याचे निष्पन्न करून तिचे नातेवाईक पति आरोपी नामे— छोटुलाल समोलाल यादव वय २१ वर्ष रा. बोरी (सिंगोरी) ता. पारशिवणी, जि. नागपूर यास विश्वासात घेवुन अधिक विचारपुस केली असता त्यानेच त्याची पत्नी मृतक हिचा पति छोटुलाल समोलाल यादव याचे दुसऱ्या महिलेशी अनैतिक संबंध असल्याने याच कारणावरून मृतक पत्नीशी नेहमी झगडाभांडण होत होते. या कारणावरून आरोपीने मृतकास रामटेक येथे मोटरसायकलवर नेवुन त्याने दि. १८/१०/२०२३ रोजी त्याची प्रेयसी सोबत मिळून खिंडसी रोडवर जंगल झुडपीत नेवून त्याची पत्नी मृतक दिव्याला प्रेयसीने डोक्यावर दगडाने मारले व दिव्याचे पतीने तीचा दुपट्ट्याने गळा आवळून खून केले. नमुद गुन्ह्याचे तपासात अनोळखी मृतक महिलेची ओळख पटवून कौशल्य पूर्वक तपास करून अवघ्या चोवीस तासाचे आत गुन्हा उघडकीस आणला.

सदर कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) तसेच मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग श्री. आशित कांबळे, पोलीस स्टेशन रामटेक येथील ठाणेदार ह्दयनारायण यादव, स्थानिक गून्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार पोलीस हवालदार रोशन काळे, शंकर मडावी, संजय बांते, नितेश पिपरोदे, उमेश फुलबेल, प्रमोद भोयर, पोलीस नायक विपीन गायधने, सुमीत बांगडे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर